॥ प्रेमस्वरूप आई ॥

गायिकाः लता मंगेशकर
गीतः माधव ज्यूलियन
संगीतः वसंत प्रभू

प्रेमस्वरूप आई। वात्सल्यसिंधु आई।
बोलावु तुज आता मी। कोणत्या उपायी ॥ धृ. ॥

नाही जगात झाली, आबाळ या जिवाची
तुझी उणीव चित्ती, आई तरीही जाची ॥ १ ॥

चित्ती तुझी स्मरेना, काहीच रुपरेखा
आई हवी म्हणोनी, सोडी न जीव हेका ॥ २ ॥

ही भूक पोरक्याची होई न शांत आई
पाहुनिया दुजांचे, वात्सल्य लोचनांनी ॥ ३ ॥

वाटे इथून जावे, तुझ्यापुढे निजावे
नेत्री तुझ्या हसावे, चित्ती तुझ्या ठसावे ॥ ४ ॥

वक्षी तुझ्या परी हे केंव्हा स्थिरेल डोके
देशील शांतवाया हृत्स्पंद मंद झोके ॥ ५ ॥

घे जन्म तू फिरून, येईन मीही पोटी
खोटी ठरो न देवा, ही एक आस मोठी ॥ ६ ॥

आबाळः पुरेशी काळजी न घेणे
जाचः छळ
हेकाः हट्ट
वक्षः छाती